महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय
आकार प्रिमायसेस सोसायटी, गेनबा सोपानराव मोझे हायस्कुल शेजारी, शास्त्रीनगर,
येरवडा पुणे-6 (2 रा मजला).

Website: https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in
ईमेल: helpdesk@mahadbt.gov.in

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विजाभज, विमाप्र व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता महाडीबीटी २.० प्रणालीवर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याबाबत

# जाहीर आवाहन

महाराष्ट्र राज्यातील विजाभज, इतर मागास व विमाप्र प्रवर्गातील सर्व विद्यार्थी, पालक, शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया महाडीबीटी २.० (MahaDBT २.०) या नवीन प्रणालीवर शै. वर्ष २०२६-२७ करिता सुरु करण्यात आलेली आहे. शिष्यवृत्ती रक्कम थेट विद्यार्थ्याच्या आधार संलग्निकृत (Aadhar Seeded) बँक खात्यामध्ये जमा होणार असल्याने, अचूक माहिती अर्जामध्ये भरावी.

## महाडीबीटी २.० पोर्टलद्वारे ऑनलाइन राबविण्यात येणाऱ्या योजना

**(अ) मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिष्यवृत्ती योजनाः**

१. विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राज्य सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना
२.विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना
३. राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती. (विजाभज / विमाप्र
४. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहातील निवासी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता प्रदान करणे (विजाभज / विमाप्र)
५. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी (PPP) योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण शिष्यवृत्ती संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या विजाभज विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता
६. इमाव प्रवर्गातील मुलींकरीता शिष्यवृत्ती (व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या मुलींकरिता १००%)
७. इमाव प्रवर्गातील मुलींकरीता शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क (व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या मुलींकरिता १००%)

**(ब) मॅट्रिकपूर्व (Pre-Matric) शिष्यवृत्ती योजनाः**

१. इयत्ता ५ वी व ७ वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती
२.इयत्ता ८ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती
३.इयत्ता ५ वी व ७ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती
४.इयत्ता ८वी व १०वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थिनींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती
५.सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता योजना
६. माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील
७. इ.१ली ते १० वी च्या वर्गात विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदान करणे
८. PM-YASASVI मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती

## महाडीबीटी २.० पोर्टलवर नोंदणी करणेसाठी विद्यार्थी /पालक व महाविद्यालयांना सूचना

**अ) विद्यार्थ्यांनी करावयाची कार्ये**

१. **महाआयडी (Maha ID) नव्याने तयार करणेः** सर्व विद्यार्थ्यांसाठी महाआयडी (Maha ID) नव्याने तयार करणे बंधनकारक आहे मागील पोर्टलवरील युजर आयडी/पासवर्डची आता गरज नाही
२. **आधार आधारित नोंदणीः** विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक वापरुन नवीन महाआयडी बनवावा. आधार पोर्टलवर आपली सर्व माहिती (पत्ता, मोबाईल, ईमेल आणि बँक खाते) अचूक व अद्यावत ठेवावी.
३. **दस्तऐवज संकलनः** आवश्यक सर्व कागदपत्रे (जातीचा दाखला उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रके इ. अभ्यासक्रमानुसार जात पडताळणी प्रमाणपत्र, शासकीय कोट्यातील प्रवेशित कॅप अलॉटमेंट लेटर व आवश्यकता असल्यास गॅप सर्टिफिकेट) स्पष्ट PDF स्वरुपात अपलोड करावीत
४. **नवीन व नूतनीकरण अर्जः** नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अशा दोन्ही अर्जासाठी नवीन महाआयडी/आधार लॉगिन करणे आवश्यक आहे. नूतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी लॉगिन नंतर "माझा अर्ज नूतनीकरण करावा" ही विशिष्ट टॅब निवडावी.
५. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्जदारांकडून संबंधित महाविद्यालय शै. वर्षाच्या सुरुवातीस शिक्षण शुल्क घेत नसल्याने केंद्र हिस्सा विद्यार्थ्यांच्या खात्यावर प्राप्त होताच संबंधित महाविद्यालयास शिक्षण शुल्काची रक्कम अदा करावी

**ब) महाविद्यालयाने करावयाची कार्येः**

**१. केवळ एकच लॉगिन (प्राचार्य लॉगिन):** महाविद्यालयासाठी आता केवळ एकच लॉगिन उपलब्ध असेल जे थेट महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे असेल (लिपीक लॉगिन पूर्णपणे बंद).
२. ज्या महाविद्यालयांना अद्यापही लॉगिन पासवर्ड बाबत काही अडचणी असतील तर त्यांनी त्यांच्या संबंधित शैक्षणिक विभागास संपर्क साधावा
**३. प्रोफाईल व शुल्क निश्चितीः** महाविद्यालयाने मागील युजर आयडी व नवीन डीफॉल्ट पासवर्डने लॉगिन करुन आपली प्रोफाईल तपासून अभ्यासक्रमनिहाय निश्चिती करण्यात आलेले शुल्क (Fee Structure) तात्काळ अद्यावत करावी.
४. **प्राचार्यांची जबाबदारीः** पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित (Pending) ठेवू नयेत, अर्ज विहित मुदतीत मंजूर करुन पुढे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची असेल.
**५. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेबाबतः** मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी संबंधित गट शिक्षण अधिकारी (BEO) यांच्याशी समन्वय करुन ऑनलाईन भरण्याकरिता संबंधितांना सहाय्य करावे

**क) महाडीबीटी पोर्टलवर अर्ज कसा भरावा:**

१. महाडीबीटी पोर्टलकरिता https://mahadbt२.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाचा वापर करावा.

२. शै. वर्षाच्या सुरुवातीस उपरोक्त पोर्टलवरील लिंकवर लॉगिन या टॅबवर "नागरिकांसाठी लॉगिन" किंवा "महाआयडीशिवाय प्रवेश करा" या पर्यायांचा वापर करुन आधार बेस लॉगिन करणेसाठी विद्यार्थ्यांनी हा पर्याय निवडा.

३. त्यानंतर आधार संलग्न मोबाईल क्रमांक ओटीपी अद्यावत केल्यानंतरच लॉगिन होईल.

४. लॉगिन झाल्यानंतर पात्र योजनेचा तपशील अद्यावत केल्यानंतर आपण लागू होणाऱ्या विभागनिहाय योजनांची यादी उपलब्ध होईल. आपणास ज्या योजनेसाठी अर्ज त्या योजनेच्या नावासमोर "पहा" क्लिक केले असता योजनेची सर्व माहिती दिसू शकेल.

५. त्यानंतर आपण निवड केलेल्या योजनांच्या समोर Apply टॅबवर क्लिक करुन विद्यार्थ्यांनी (उदा. वैयक्तिक माहिती चालू व मागील शैक्षणिक तपशील, योजने संबंधित आवश्यक कागदपत्रे) याप्रमाणे तपशील अद्यावत करुन अर्ज ऑनलाईन समाविष्ट सबमीट करावा व प्रिंट किंवा पीडीएफ मध्ये जतन करुन ठेवावा.

६. आवश्यक ती सर्व माहिती उदा. जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचे रहिवासी, दिव्यांगत्व, कौटुंबिक उत्पन्न इ. पोर्टलमध्ये काळजीपुर्वक भरावी.

**ड) महाविद्यालयासाठी सूचना:**

१) महाडीबीटी २.० पोर्टलवर विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करणे व अर्ज करणेसाठी सहकार्य करावे.

२) इमाव, विजाभज, विमाप्र कोणत्याही पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची रक्कम घेवू नये.

३) आपल्या महाविद्यालयाचे नाव, महाविद्यालयास मान्य असलेल्या अभ्यासक्रमांची नावे, अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमता, महाविद्यालयाच्या व अभ्यासक्रमाच्या मान्यतेचे विविध आदेश शुल्क रचना इ. माहिती पोर्टलवर मॅप करणेसाठी संबंधित शैक्षणिक यंत्रणा. (उदा. संचालनालयास/विद्यापीठास / परिषदेस /FRA) यांचेकडून मॅप करुन घेण्याची कार्यवाही करिता करावी.)

**अधिक माहिती helpdesk@mahadbt.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क करावा. ०२२-४९१५०८००/१८००१०२५३११ अथवा तांत्रिक अथवा प्रशासकीय तक्रारीकरिता आपल्या लॉगिन मधून स्क्रीनशॉटसह तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे.**